- प्रकरण पाचवे -

बँकेची विविध सामाजिक कार्ये

५•१ प्रस्तावना•

५•२ सामुदायिक मोफत विवाह•

५•३ अंत्यसंस्कार सहाय्य•

५•४ आपत्काल सहाय्य•

५•५ निराधार वृध्दांना वस्त्र व अर्थसहाय्य•

५•६ स्त्री कल्याणासाठी बँकेचे कार्य•

५•७ महिलांना मोफत शिलाई शिक्षण•

५•८ आकर्षक ठेव बक्षिस योजना•

५•९ सुसंस्कारीय योगक्षेम पीठ•

५•१० लोक शिक्षण (मासिक चर्चात्मक बैठक)

५•११ मुद्रण व प्रकाशन विभाग•

५•१२ सभासदांची विनामूल्य सेवा•

५•१३ समारोप•

•••

प्रकरण पाचवे

बँकेची विविध सामाजिक कार्ये

५•१) प्रस्तावना :-

श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि•, हुपरी या संस्थेच्या सामाजिक कार्याबाबत संपूर्ण भारतात कौतुक झालेले आहे• मनुष्य जीवनाला आवश्यक असणा-या अनेकविध गोष्टींचे उपक्रम पैसाफंड बँकेच्या सहकार्याने वेळोवेळी पार पाडले जातात• आपल्या बँकेमार्फत लोकांच्या गरजा ओळखून त्यांच्या परिपूर्तीसाठी कार्य करणा-या अनेक उपसमित्या निर्माण करून त्याद्वारे सामाजिक सेवा उपक्रम पार पाडले जातात• यामागे बँकेचा हेतू हा की, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या कमकूवत वर्गाचे राहणीमान सुधारावे व त्यांना स्वावलंबनाने जगता यावे• अशा उपक्रमामध्ये सामुदायिक मोफत विवाह समारंभ, अंत्यसंस्कार सहाय्य, निराधार वृध्दांना वस्त्र व अर्थसहाय्य महिलांना मोफत शिलाई शिक्षण, आकर्षक ठेव बक्षिस योजना या आणि अशा अनेक योजना लोकप्रिय आणि लोकमान्य बनल्या आहेत• या विविध सामाजिक कार्यांची सविस्तर चर्चा या प्रकरणात केली आहे•

५•२) सामुदायिक मोफत विवाह :-

पूर्वीच्या काळी सर्वसामान्य लोकांना लग्नकार्य म्हणजे एकप्रकारचे संकट वाटत असे, "घर पहावं बांधून लग्न पहावं करून" अशी म्हण सुध्दा प्रचलित होती• लग्न ही सर्वांना आवश्यक अशी गोष्ट आहे• पूर्वी

घरातल्या मुलामुलींचे लग्न ठरल्यावर गोरगरीब माणसे शेतीवाडी अथवा घरदार विकून किंवा स्वतःला वेठबिगारीवर गुलामासारखे विकून अथवा सावकारांची कर्जे काढून लग्नकार्य करीत असत. लग्नासाठी काढलेली कर्जे फेडता फेडता सारे आयुष्य निघुन जात असे. गोरगरीब व सामान्य शेतकऱ्यांच्या जीवनात लग्नकार्यामुळे होणारा हा दुष्परिणाम/उध्वस्तपणा पाहून, पैसाफंड बँकेच्या संचालकांनी लोकांच्या सोयीसाठी व भल्यासाठी सदरचा "सामुदायिक मोफत विवाह समारंभाचा" प्रर्याय शोधू काढला.

कोल्हापूर संस्थानचे छत्रपती राज्यवाड्यात सामुदायिक विवाहाचा कार्यक्रम घडवून आणित. त्यांचा आदर्श घेऊन बँकेने कै. आप्पासाहेब बाळासाहेब नाईक (दादा) यांच्या नेतृत्वाखाली सन १९६२ मध्ये सामुदायिक मोफत विवाहाची प्रथा पु. छात्रगुरु महाराज यांचे आर्शिवादाने सुरू केली.

सामुदायिक मोफत लग्नाच्या पध्दतीने किमान कमकुवत लोकांना लग्न खर्चात बरीचशी बचत करता येते. सदर सामुदायिक विवाहासाठी पहिल्या एका शेअरचे डिव्हीडंड रक्कम देणगी म्हणून सभासदांकडून कायम ठेवली जाते.

सदर योजनेअन्वये सन १९६२ साली कार्यास सुरवात झाली व पहिल्या मुहूर्तावर फक्त दोन लग्ने तारीख १२.३.१९६२ रोजी होऊन सदर कार्य आजतागायत अव्याहतपणे चालू आहे. त्याची माहिती तक्ता क्र.५.१ मध्ये दिली आहे.

तक्ता क्र.५.१

सामुदायिक मोफत लग्नाचा तपशील

अ.क्र.	वर्ष	देणगी रक्कम जमा (डिव्हीडंड)	मुहूर्त संख्या	झालेली लग्ने	एकूण खर्च रक्कम रुपये	एका लग्नास सरासरी खर्च रुपये
१	२	३	४	५	६	७
१.	१९६२	५६९	२	२८	१,०५९	३८
२.	१९६३	५९२	२	४३	८६९	२०
३.	१९६४	६२५	२	६४	१,२१९	१९
४.	१९६५	१,४२६	२	६०	१,४८६	२५
५.	१९६६	१,७५०	२	५९	१,१०९	१९
६.	१९६७	१,६८०	२	६५	१,५०४	१८
७.	१९६८	१,९६५	२	५७	१,३९०	२४
८.	१९६९	१,९३३	२	३९	१,९६९	५०
९.	१९७०	१,[illegible]	२	५८	१,८०३	३१
१०.	१९७१	२,०८०	२	६५	१,३३१	२०
११.	१९७२	२,०४४	२	९०	२,४३७	२७
१२.	१९७३	२,२०७	२	५६	१,८३९	३०
१३.	१९७४	२,३५८	२	९३	३,०८३	३३
१४.	१९७५	२,७२०	२	८७	२,७५६	६१
१५.	१९७६	२,९३२	२	६२	१,९५८	३२
१६.	१९७७	२,०८७	२	६७	२,२२१	३३

.....

૧	૨	૩	૪	૫	૬	૭
૧૭.	૧૯૭૮	૪,૭૪૫	૨	૬૨	૨,૭૧૪	૨૯
૧૮.	૧૯૭૯	૪,૩૪૮	૨	૬૯	૩,૩૨૯	૪૮
૧૯.	૧૯૮૦	૪,૦૬૫	૨	૩૩	૧,૬૨૩	૪૯
૨૦.	૧૯૮૧	૫,૨૩૦	૨	૬૫	૨,૭૦૧	૪૪
૨૧.	૧૯૮૨	૫,૬૨૮	૨	૬૩	૩,૦૭૪	૪૯
૨૨.	૧૯૮૩	૬,૦૮૦	૨	૬૪	૩,૧૧૪	૬૧
૨૩.	૧૯૮૪	૬,૪૧૯	૨	૬૫	૩,૧૨૩	૬૦
૨૪.	૧૯૮૫	૬,૭૦૪	૨	૪૯	૩,૮૦૪	૭૭
૨૫.	૧૯૮૬	૬,૯૮૧	૨	૫૧	૯,૦૧૮	૧૭૬
૨૬.	૧૯૮૭	–	૨	૧૩	૪,૮૬૭	૩૭૪
૨૭.	૧૯૮૮	–	૨	૧૬	૫,૫૧૩	૩૪૪
૨૮.	૧૯૮૯	૭,૬૫૮	૨	૨૮	૧૦,૧૨૨	૩૯૦
૨૯.	૧૯૯૦	૨૬,૦૦૬	૨	૧૭	૭,૯૫૨	૪૬૭
૩૦.	૧૯૯૧	–	૨	૧૧	૭,૬૪૬	૬૧૧
૩૧.	૧૯૯૨	–	૨	–	–	–
૩૨.	૧૯૯૩	–	૨	૭	૪,૧૨૦	૫૮૮

याबाबत सुमारे एक महिना अगोदर सामुदायिक मोफत लग्न समितीमध्ये मुहूर्ताची तारीख निश्चित करून वर्तमान पत्रातून व जाहिराती द्वारे सर्वांना मुहूर्ताची माहिती दिली जाते. लग्न मंडप, स्पिकर, वाजंत्री, मंगलवाद्ये वगैरेची व्यवस्था संस्थेमार्फत केलेली असते. तसेच लग्नाच्यावेळी सर्व पाहुण्यांना आवश्यकतेनुसार चहा किंवा सरबत देण्यात येतो. याचेळच्या अक्षता, दक्षिणा, हार वगैरेचा खर्च संस्था करीत असून वधू-वराना काहीही खर्च करावा लागत नाही.

लग्न मुहूर्तावेळी सहकार गीत गायिले जाते व तद्नंतर मंगलाष्टका म्हणण्यात येतात. त्यानंतर वधू-वरांना मंगल आहेर प्रदान करण्यात येऊन त्यांचा सामुदायिक फोटो घेतलेनंतर या समारंभाची सांगता होते. या विवाह सोहळ्यासाठी कोणत्याही श्रीमंत अगर प्रतिष्ठीत व्यक्तिच्या लग्नाप्रमाणे ७ ते १० हजार जनसमुदाय जमतो.

तक्ता क्र.५.१ वरून या सुविधांचा तपशील लक्षात येतो. दरवर्षी दोन मुहूर्तावर मोफत लग्नाचे आयोजन होत असल्याचे दिसते. सन १९९३ अखेर पर्यन्त १७५४ लोकांना या सुविधेचा लाभ मिळाला. एक सामाजिक जबाबदारीची जाण ठेऊन बँकेचे हे कार्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. इतर बँकाच्यामध्ये अशी योजना नाही. प्रत्येक लग्नाचा खर्च १९९३ साली सुमारे रुपये ६००/- पर्यन्त होता. हा खर्च किंमत पातळीच्या वाढीबरोबर वाढत असल्याचे दिसते.

५.३) अंत्यसंस्कार सहाय्य :-

१ आक्टोबर, १९६५ पासून बँक, निराधार, गरीब, गरजू व्यक्तींच्या अंत्यसंस्कारासाठी अर्थसहाय्य करते.

संस्थेमार्फत अंत्यसंस्कारासाठी लागणारे साहित्याचे दुकान काढून बाबूराव मासोजी थोरवत यांचेकडे चालविण्यासाठी दिले आहे. (१९७९) या दुकानात अंत्यसंस्कारासाठी लागणारे सर्व साहित्य योग्य दरात विकत मिळते.[१]

पुढील तक्ता क्र.५.२ वरून बँकेने या कार्यासाठी केलेल्या अर्थसहाय्या संबंधी सविस्तर माहिती मिळते.

तक्ता क्र.५.२

अंत्यसंस्कार सहाय्य - लाभधारक आणि अर्थसहाय्य.

वर्ष १	लाभधारक २	अर्थसहाय्य (रुपये) ३
१९८०-८१	९	९५१
१९८१-८२	९	१,०३०
१९८२-८३	४	४८०
१९८३-८४	११	१,३२०
१९८४-८५	७	८४०
१९८५-८६	१०	१,९३५

.....

१	२	३
१९८६-८७	५	६००
१९८७-८८	१०	१,४१०
१९८८-८९	१६	२,८५०
१९८९-९०	१८	३,६००
१९९०-९१	१९	४,९००
१९९१-९२	३६	७,८००
१९९२-९३	४१	१२,३००

तक्ता क्र•५•२ वरून हे स्पष्ट होते की, बँकेच्या या योजनेचा लाभ अनेक गरीब लोकांच्या अंत्यसंस्कारासाठी झालेला आहे• त्याचप्रमाणे बँकेकडून केलेली मदत पण प्रत्येकवेळी वाढलेली आहे• अंत्यसंस्कारासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या किंमतीमध्ये वाढ झाली• त्याबरोबर बँकेकडून दिल्या जाणाऱ्या मदतीत वाढ झाली• सन १९८०-८१ मध्ये ही मदत एका व्यक्तिस रुपये ११०/- प्रमाणे दिली• तर सन १९९२-९३ मध्ये प्रती व्यक्तिस रुपये ३००/- प्रमाणे ४१ व्यक्तींच्या अंत्यसंस्कारासाठी रुपये १२,३००/- ची मदत बँकेने केली•

५•४) आपत्काल सहाय्य :-

नैसर्गिक आपत्ती, वादळ, पूर, प्रकोप, अतिवृष्टी यासारख्या आपत्तीचेवेळी तात्काळ मदत म्हणून रुपये १००/- पर्यंत धान्य, कपडे व भांडी या स्वरुपात गरजूंना मदत देण्यासाठी तारीख २८ फेब्रुवारी, १९७९ पासून आपत्काल सहाय्य फंड निर्धारित करण्यात आला आहे•

सन १९७९ पासून १९८७ पर्यन्त संस्थेने या योजनेपोटी ८० व्यक्तींना रुपये ४,१५५/- इतके अर्थसहाय्य केले आहे•[2]

सन १९८९-९० साली या फंडातून रुपये २००/- जळीतग्रस्तांना अर्थसहाय्य देऊन रुपये १,०००/- इंगळी पुरग्रस्तासाठी मदत दिली आहे व रुपये १,०००/- मुख्यमंत्र्यांच्या पुरनिवारण निधीसाठी दिले आहेत•[3] त्याच प्रमाणे सन १९९०-९१ या वर्षी २२ जळीतग्रस्तांना रुपये २,१९६ ची मदत दिली आहे•

५•५) निराधार वृध्दांना वस्त्र व अर्थसहाय्य :-

समाजातील गरीब, निराधार इसमाना या निधीतून वस्त्र सहाय्य व इतर सहाय्य केले जाते• ही मदत किंवा अर्थसहाय्य बँकेच्या सामुदायिक मोफत विवाह समारंभाचेवेळी केली जाते• तक्ता क्र•५•३ वरुन बँकेच्या या कार्याची माहिती मिळते•

तक्ता क्र.५.३

निराधार वृध्दांना वस्त्र व अर्थसहाय्य - लाभधारक आणि सहाय्य रक्कम (रुपये).

वर्ष	लाभधारक	सहाय्य रक्कम
१९८०-८१	-	३२०
१९८१-८२	९	६१६
१९८२-८३	६	५८८
१९८३-८४	२	१७४
१९८४-८५	१०	१,२२८
१९८५-८६	-	-
१९८६-८७	-	-
१९८७-८८	२	६५७
१९८८-८९	-	-
१९८९-९०	४	७८४
१९९०-९१	३	५५०
१९९१-९२	३	६००
१९९२-९३	-	२२२

तक्ता क्र.५.३ वरून असे दिसते की, या योजनेअंतर्गत सन १९७९ पासून बँकेने निराधार वृध्दांना, स्त्रियांना वस्त्र सहाय्य, अंथरुन, पांघरुन इत्यादीसाठी सहाय्य केले आहे. या सहाय्यामध्ये अस्थिरता आढळते. केव्हा जास्त तर केव्हा कमी याप्रमाणे बँकेचे हे कार्य गरजेप्रमाणे चालू आहे.

सन १९८४-८५ साली या योजनेअंतर्गत १० वृध्दांना व स्त्रियांना रुपये १,२२८/- चे सहाय्य, कपडे रुपाने साडी, चादर, जमखाना व धोतरे या स्वरुपात देण्यात आली. या योजनेअंतर्गत या वर्षी केलेली मदत फार मोठी आहे.

५.६) स्त्री कल्याणासाठी बँकेचे कार्य :-

बदलत्या परिस्थितीनुसार समाजाचे परिवर्तन घडविणे, ही एक फार मोठी जबाबदारी आहे. सर्व प्रकारचा विकास साधणाऱ्या हुपरीमध्ये समाजाच्या पाळण्याची दोरी ज्या स्त्रियांच्या हातात आहे. त्या स्त्रियांची एकत्रित कार्यशील, संस्कारक्षम अशी संघटना निर्माण व्हावी या हेतूने, श्री पैसा फंड शेतकी सहकारी बँकेने १८ मे, १९७३ रोजी सौ.सुमनताई जयकुमार मगदूम यांच्या नेतृत्वाखाली पुढील उद्देशानी वनिता विभागाची निर्मिती केली.

१. स्त्रियांना सुविचार ऐकायला मिळावेत व मार्गदर्शन लाभावे.
२. स्त्रियांच्यात बचतीची सवय वाढावी.
३. घरगुती लघुउद्योगधंद्याचा प्रचार व प्रसार व्हावा इत्यादी.

बँकेच्या संचालक, सौ. सुमन जयकुमार मगदूम यांच्या अध्यक्षते खाली सुरुवातीला वनिता विभागासाठी आठ सदस्यांची एक समिती स्थापन करण्यात आली. वनिता विभागाने महिला शिबीराचा उपक्रम सुरू केला असून महिला वर्गाकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. बँकेने चालविलेल्या शिक्षणाची व्यवस्था व मोफत औषध वाटपाचे काम हा विभागच पाहतो. इतरीत महिलांचे म्हणून जे जे सार्वजनिक कार्यक्रम होतात. त्यात वनिता विभाग प्रामुख्याने भाग घेत असतो.

शिलाई शिक्षणाची योजना स्त्रियांच्या दृष्टीने फारच उपयुक्त ठरली आहे. सदरचे काम सभासदांच्या दुसऱ्या शेअरच्या डिव्हीडंड देणगीतून केले जाते. मुलांना ट्रिपल इंजेक्शन्स, पोलिओ डोस व प्रोटीन्स देण्याची महत्वपूर्ण कामगिरी वनिता विभाग उत्तमरितीने पार पाडीत आहे. सदरचे काम सभासदांच्या तिसऱ्या शेअरच्या डिव्हीडंड देणगीतून पूर्ण केले जात आहे.[४] सन १९८५ पासून ट्रिपल इंजेक्शन, पोलिओ डोस व प्रोटिन्स याचा खर्च सरकारकडून केला जातो.

५.७) महिलांना मोफत शिलाई शिक्षण :-

संस्थेच्या संचालिका श्रीमती सुमन जयकुमार मगदूम यांच्या नेतृत्वाखाली महिलांसाठी सहा महिन्याचा कोर्स पुढील उद्देश साध्य करण्यासाठी ठेवला आहे.

१. योग्य दरात लोकांचे कपडे शिऊन द्यावेत.
२. वृध्दांचे कपडे व फाटके कपडे पैसे न घेता शिऊन देणे.

३• सभासदांना आणि त्यांच्या कुटुंबियांना व्यवस्थित जीवन जगण्यास मदत करणे•

४• सभासदांमध्ये बचत करण्याची प्रवृत्ती वाढविणे•

५• नित्याच्या व्यवहारात गरजेचे वाटणारे शिवणकाम स्त्रियांना स्वत: करता यावे·

कोर्ससाठी लागणारा खर्च म्हणजे शिलाई मशिन, कापड कातरण्यासाठी लागणारे सर्व साहित्य इत्यादीसाठीचा सर्व खर्च बँक करते• ह्याशिवाय प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याची त्याच्या कोर्सची फी रुपये ४०/- प्रमाणे त्यांच्या प्रशिक्षकेला बँक देते• या कार्याची सविस्तर सांख्यकिय माहिती तक्ता क्र•५•४ मध्ये दिली आहे•

तक्ता क्र•५•४

महिलांना मोफत शिलाई शिक्षण - भाग घेतलेल्या महिला, पास झालेल्या महिला, बँकेला आलेला खर्च, मशिनसाठी बिनव्याजी कर्ज इत्यादी•

वर्ष	भाग घेतलेल्या महिला	पास झालेल्या महिला	बँकेने केलेला खर्च	मशिनसाठी बिनव्याजी कर्ज (रुपये)
१	२	३	४	५
१९७४	२१	१९	उ•ना•	उ•ना•
१९७५	३२	३२	उ•ना•	उ•ना•
१९७६	४०	४०	उ•ना•	उ•ना•
१९७७	३९	३९	उ•ना•	उ•ना•
१९७८	२४	२४	उ•ना•	उ•ना•
१९७९	३१	३१	१,३५४	उ•ना•
१९८०	३१	३१	६१३	उ•ना•
१९८१	४०	४०	६६३	४,७५०
१९८२	४३	३२	२,३६०	४,२००
१९८३	५०	४५	४,२००	४,२००
१९८४	४०	३५	-	६,८३१
१९८५	४९	४१	२,६६०	७,०१७
१९८६	४९	-	८,१५७	८,१५७

•••••

१	२	३	४	५
१९८७	४९	४९	५,२०७	१६,४७५
१९८८	३९	३९	३,६५२	१९,३९६
१९८९	४५	४५	४,११०	३४,४९०
१९९०	४९	४९	४,९५७	३०,८९१
१९९१	४२	-	५,३८२	५८,५२२
१९९२	१९	-	३,४०२	६९,५९८
१९९३	२३	-	३,१६९	-

तक्ता क्र.५.४ वरून असे दिसून येते की, या कार्यक्रमात भाग घेणा-या महिलांची संख्या जरी वाढत असलेली दिसून येत असली तरी या वाढीचा दर मात्र अतिशय मंद आहे. सन १९९३ अखेर ८१६ महिलांना याचा फायदा झाला.

बँकेकडून या कार्यावरती होणा-या खर्चामध्ये मात्र अस्थिरता आढळते. कारण सन १९७९ मध्ये याचे प्रमाण रूपये १,३५७/- होते. तर सन १९८० मध्ये हे प्रमाण कमी म्हणजे रूपये ६१३/- इतके झाले. सन १९८३ मध्ये रूपये ४,२००/- इतका झाला. सन १९८८ पासून मात्र यामध्ये वाढ होत असलेली दिसून येते.

शिलाई मशिनसाठी बँकेकडून घेतल्या जाणा-या बिनव्याजी कर्जात मात्र सन १९८३ पासून सतत वाढ होत आहे. सन १९९० मध्ये रूपये ५८,५२२/- चे बिनव्याजी कर्ज दिले गेले. यावरून बँकेच्या ध्येय-धोरणाची सखोलता लक्षात येते.

५·८) आकर्षक ठेव बक्षिस योजना :-

ठेवीदारांचा संस्थेवरील विश्वास व सभासदांच्या ठेवीवरच संस्थेचा उत्कर्ष साधला जातो. म्हणून पैसाफंड बँकेचे संस्थापक स्वर्गीय आ.बा. नाईक यांनी २६ जानेवारी, १९८१ पासून सभासदांचा उत्कर्ष साधण्यासाठी त्यांना बचत, अधिक व्याज आणि भव्य बक्षीसे असा तिहेरी लाभ मिळावा म्हणून ठेवीदारासाठी ठेव बक्षीस योजना चालू केली आहे. सदर योजनेमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे ७ गट असून प्रत्येक गटांमधून १ ते ३ नंबरपर्यन्त बक्षीसे दिली जातात. अशी सोडत प्रत्येक वर्षी २४ जानेवारी, रोजी व बक्षीस वितरण समारंभ २६ जानेवारी रोजी केला जातो. तसेच सर्व गटामधून १ सामाईक बंपर बक्षीस सन १९८८ पासून चालू आहे.

आकर्षक ठेव बक्षीस योजनेत पुढीलप्रमाणे ७ गट केले आहेत. ते तक्ता क्र.५.५ मध्ये दर्शविले आहेत.

तक्ता क्र.५.५

आकर्षक ठेव बक्षीस योजनेचे गट

गट क्रमांक	ठेवीची रक्कम (रुपये)
१	२०,००१ चे वरील ठेव.
२	१०,००१ ते २०,०००
३	५,००१ ते १०,०००
४	१,००१ ते ५,०००
५	५०१ ते १,०००
६	१०१ ते ५००
७	१ ते १००

सर्व गटामधून एक भव्य बंपर बक्षीस•

सदर योजनेत प्रवेश फी नाही• सभासदांनी ठेव खाते उघडले की, सदर योजनेत सामील होता येते•

५•१) सुसंस्कारीय योगक्षेम पीठ :-

नित्ययुक्ता उपासते । योगक्षेमं वहाम्यहम् ।। हे भगवंताचे घोष वाक्य भगवान सूर्याचा उदय होताच सृष्टी खडबडून जागी होते• पक्षी आकाशात स्वच्छंद विहार करतात• पाने टवटवीत होतात• मनोहर चेहऱ्यावर तेज प्रकट होत असते• सूर्याचा आदर्श शिक्षणात सुसंस्कार झाल्या शिवाय दैवी महापुरुषांची निर्मिती होणार नाही•

१ नोव्हेंबर, १९८४ पासून दर महिन्याच्या पहिल्या रविवारी "सूर्य प्रार्थना" श्री विठ्ठल मंदिर, हुपरी येथे करण्याचा उपक्रम चालू केलेला आहे• सूर्य प्रार्थनेच्या दरमहा पत्र प्रतितून सूर्य महात्म्य प्रकट केले जाते•

सूर्याभूती समभाव असलेने त्याच सूर्यनारायणाला साक्षी ठेऊन सकाळी ११-०० वाजता सामुदायिक सूर्यप्रार्थनेने संस्थेच्या दैनंदिन कामाची सुरुवात प्रसन्न मनाने केली जाते•

प्रतिवर्षी गणेशोत्सवात विविध ज्ञानी महापुरुषांची, प्रतिभावंतांची व्याख्याने आयोजित करुन सुसंस्कार घडविले जातात• हे जनजागृतीचे काम संस्था अव्याहतपणे करीत आहे•

प्रतिवर्षी मकरसंक्रातीचेवेळी हुतात्मा स्मारकाचे भव्य प्रांगणांत गावातील सर्व विद्यालये सहकारी संस्था पंचायत समिती व गावचे अबालवृध्द सूर्यसंक्रमणाला सूर्यास्तावेळी भक्तीभावाने वंदन करुन सूर्यप्रार्थना करतात व भगिनी हळदीकुंकू देऊन स्नेहभाव वृध्दींगत करतात. तर सर्वजन सामुहिक तिळगूळ वाटप करुन सर्वांचे क्षेम योजतात व सर्वांच्या सुखदुःखात सामील होण्याचे अभय मिळवितात.

माणसास सत्ता मिळेल, विद्या संपादन करता येईल, वैभवसुध्दा प्राप्त होईल. पण माणसांत सुसंस्कार नसतील तर त्या वैभवाची किंमत कवडीमोल ठरते.

५.१०) <u>लोक शिक्षण (मासिक चर्चात्मक बैठक)</u> :-

संस्थेच्या चालू कामाची माहिती देणे व अडचणी समजून घेणे व शक्यतो प्रमाणे निर्णय घेणे त्यासाठी प्रत्येक महिन्याचे पहिल्या बुधवारी मासिक चर्चात्मक बैठक घेणेचे कार्य सन १९७० पासून १९७४ पर्यन्त सुरु होते. या चर्चेच्यावेळी सभासदांना कोणकोणत्या अडचणी येतात. याची चर्चा केली जात होती. त्याचप्रमाणे सभासद देखील बँकेला काही सूचना करीत असत., यावेळी शेती, सहकार, ग्रामीण अर्थव्यवस्था, इतर माहिती व लघु उद्योगधंदे या विषयावर काही विचारवंत तज्ञांची व्याख्याने आयोजित केली जात.

ही व्याख्याने, तज्ञांचे विचार एकत्रित करुन छापून त्यांच्या प्रती सभासदांना दिल्या जातात. जे सभासद निरक्षर आहेत. त्यांच्यासाठी तज्ञांची व्याख्याने टेपरेकॉर्डर टेप करुन त्यांना पुन्हा पुन्हा ऐकवली जातात.

याप्रमाणे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या बुधवारी ही मिटींग आयोजित केली जात होती. पण या कार्यक्रमाला सभासदांचा तितकासा प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून सन १९७४ पासून हा कार्यक्रम बंद करण्यात आला.

५.११) <u>मुद्रण व प्रकाशन विभाग</u> :-

हुपरीतील वाढता व्यापार उद्योग शिक्षण संस्था, बँका, दवाखाने यांची गर्दी आणि रेंदाळ, इंगळी, पट्टणकोडोली, यळगूड, तळंदगे या गावांचा हुपरीशी नित्य संबंध विचारात घेतला तर हुपरीत एखादा छापखाना असण्याची निकड फार दिवसाची होती. खाजगीरित्या हे प्रयत्न झालेही होते पण ते यशस्वी झाले नव्हते. बँकेनेच शेवटी यात लक्ष घातले आणि एक छोटी छापखाना सुरू करण्यात आला. सुरुवातीला फक्त मुद्रण विभाग होता. त्याच्या जोडीला प्रकाशन विभागही तिमाहीस प्रसिध्द केली जाते. सहकार पत्रिकेच्या मार्फत बँकेने हाती घेतलेल्या उपक्रमांची व संस्था करीत असलेल्या कार्याची त्याचप्रमाणे आधुनिक शेती विषयक तंत्रज्ञान व संस्था परिसरातील सहकार विषयक ज्ञान व माहिती लोकांना दिली जाते. एकंदरीत चालू घडामोडीची सविस्तर माहिती पत्रिकेत असते. बँकेच्या सभासदांना अंक मोफत पाठविले जातात. दिनांक २६ जानेवारी, १९७४ रोजी पहिला अंक प्रकाशित झाला. तेव्हापासून हे कार्य अव्याहतपणे चालू असून श्री यशवंत रामचंद्र नाईक यांच्या अध्यक्षतेखाली या विभागाची एक स्वतंत्र समिती कार्यरत आहे.

५•१२) सभासदांची विनामूल्य सेवा :-

सभासदांचे विक्री मालाचे अधिकारपत्र घेऊन त्यांचे बिलाची रक्कम बँकेच्यावतीने वसूल करून विनामूल्य काम केले जाते• तसेच साखर कारखान्याकडून सभासदांची साखर त्यांच्या शेअर्सच्या प्रमाणात पंचगंगा (इंचलकरंजी), दत्त (शिरोळ), छ•राजाराम(कोल्हापूर) कारखान्याकडून आणून सभासदांना देण्याची व्यवस्था केली जाते•[५]

५•१३) समारोप :-

पैसाफंड बँकेने स्थापनेपासून हुपरी आणि हुपरी परिसरातील समाज जीवनातल्या गरजा ओळखून विविध नाविण्यपूर्ण योजना हाती घेतल्या आहेत आणि त्यायोगे प्रत्येक व्यक्तिपर्यन्त बँक जाऊन पोहचली आहे• हुपरीची औद्योगिक वाढ झपाट्याने होत आहे व लोकसंख्या वाढत आहे• लोकांचे उत्पन्न वाढत आहे• त्यांच्या गरजा वाढत आहेत• ह्या गरजा पूर्ण करण्याच्या प्रयत्नात बँकेने सुरू केलेल्या कार्याचा व्याप वाढत आहे• अनेक गरीब, श्रीमंत सर्वच लोक या कार्याचा लाभ घेत आहेत•

•••••

तळटीपा

१. श्री पैसाफंड सहकार पत्रिका -- १५ ऑगष्ट, १९७९
अंक २२ वा, पा.क्र.६.

२. वार्षिक अहवाल - १९८६-८७, पा.क्र.५.

३. वार्षिक अहवाल - १९८९-९०, पा.क्र.५.

४. सहकार भूषण - आप्पासाहेब नाईक, पा.क्र.२१.

५. वार्षिक अहवाल - १९८६-८७, पा.क्र.४.

.....